## ८.राज्यातील शासनमान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना.

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. शिष्यवृत्ती-२०२१/प्र.क्र.९४/का-१२ दि.१७ जानेवारी २०२२ |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती | राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या वैद्यकीय शिक्षण व संलग्न शिक्षणाकरिता खाजगी शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना याअंतर्गत शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती केली जाते.<br>अ. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)<br>ब. उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असणारे अभियांत्रिकी, औषधनिर्माण, एच.एम.सी.टी., एच.एम.सी.टी., वास्तुशास्त्र, एम.बी.ए., एम.सी.ए<br>क. कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत पदविकातंर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम.<br>या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना शुल्क निर्धारण समिती व तत्सम समितीने मंडळाने ठरवुन दिलेल्या दराने शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती केली जाते. |
| ०४ | पात्रता/निकष | • विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>• पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये २.५० लाखापेक्षा जास्त असावी<br>• विद्यार्थी पूर्णवेळ नोकरीत नसावा.<br>• एकाच कुटूंबातील सर्वांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.<br>• व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतेवेळी जातवैधता प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.<br>• विद्यार्थी हा माध्यमिक / उच्च माध्यमिक किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठ / बोर्डाची समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असावा. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | ऑनलाईन अर्ज नमुना https://mahadbt.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्जाची किंमत असल्यास किती | सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ०७ | जोडावयाची कागदपत्रे | प्रत्यक्ष योजनेचा लाभ देतेवेळी जात वैधता प्रमाणपत्र ,जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला, प्रवेश पावती व अनुषंगिक कागदपत्रे |